UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# || संशोधक ||

**पुरवणी अंक ८ – मार्च २०२४ (त्रैमासिक)**

- शके १९४५ • वर्ष : ९२ • पुरवणी अंक : ८

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक वैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे • डॉ. एस. व्ही. पणदे • डॉ. एम. बी. मगदूम

* प्रकाशक *

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०

Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/-

वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.**

अक्षरजुळणी : सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

ISSN No. 2394-5990


३५. 'उगवाई' नियतकालीकातील कथांमध्ये आलेल्या स्त्रियांचा संघर्ष

- प्रा. मच्छगंधाली नितीन तारळेकर ---------- १५९

३६. महाराष्ट्रातील शेतकरी, कामगारांचे जागतिक प्रगतीत योगदान

- प्रा. सचिन पोपट सवने ---------- १६३

३७. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षणविषयक विविध योजना

- प्रा.डॉ.संजीव सुखलाल बोडखे ---------- १६८

३८. पंडिता रमाबाईंच्या जडणघडणीतील अनंतशास्त्री डोंगरे यांचे योगदान

- प्रा. डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले ---------- १७२

३९. पेशवेकालीन विवाहविषयक कागदपत्रे - सबाल्टर्न (वंचित) इतिहासलेखनाचे महत्त्वाचे दस्तऐवज

- डॉ. रामचंद्र वसंत कुंभार ---------- १७६

४०. गांधीवादी आदिवासी नेत्या राजमोहिनी देवी

- डॉ. सुरेश बसंत शिखरे ---------- १८०

४१. प्रचितगडाचा इतिहास

- १) डॉ. सोनावाले राजेंद्र रघुनाथ, २) प्रा. कुंभार भाग्यश्री शामराव ---------- १८३

४२. किल्ले प्रतापगड : इतिहास व ऐतिहासिक वास्तू

- प्रा. डॉ. विश्वनाथ पवार ---------- १८६

४३. वंचित इतिहासाच्या परिप्रेक्षातून दक्षिण महाराष्ट्रातील स्त्रियांचे स्वातंत्र्य चळवळीत योगदान

- १) डॉ. हाजी नदाफ २) डॉ.रणजीत माने ---------- १९०

४४. इतिहासलेखन प्रवाहातील योगदान सबाल्टर्न स्टडीजचे

- प्रा. डॉ. बाळासाहेब नानासाहेब देवकाते ---------- १९५

४५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सायमन कमिशन

- प्रा. डॉ. बाळासो निवृत्ती कर्पे ---------- १९९

४६. स्वातंत्र्यसैनिक शिवलाल त्रिलोकचंद पोरवाल : अज्ञात भारतीय स्वातंत्र्यसैनिकाचा शोध

- प्रा. डॉ. ओलेकर प्रमोदकुमार अंकुश ---------- २०१

४७. सबाल्टर्न इतिहास : अर्थ, स्वरूप व मर्यादा

- डॉ. डी. ई. मनेरे ---------- २०८

# किल्ले प्रतापगड : इतिहास व ऐतिहासिक वास्तू


**प्रा. डॉ. विश्वनाथ पवार**

डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय

रामानंदनगर, (बुर्ली) ता. पलूस, जि.सांगली

मो.नं.७७९८१२२०२६

Email : vppawar13968@gmail.com


## प्रास्ताविक :

छ. शिवाजी महाराजांनी जावळी विजयानंतर प्रतापगड स्वराज्यात समाविष्ठ केला. छ.शिवाजी महाराजांनी भोरप्या डोंगरावर किल्ल्याचे बांधकाम करून घेतले. आदिलशाही दरबाराने छ.शिवाजी महाराजांच्या बंदोबस्तासाठी अफजलखानाची नियुक्ती केली. महाराजांनी अत्यंत मुत्सद्देगिरीने अफजलखानाचा वध केला. प्रतापगडावर बालेकिल्ला, भवानी मंदिर, केदारेश्वर महादेव मंदिर, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा, अफजलखानाची कबर इत्यादी ऐतिहासिक वास्तू आहेत.

## हेतू/उद्देश :

१) प्रतापगडाचा इतिहास अभ्यासने

२) जावळी विजयाचा व प्रतापगडच्या उभारणीचा अभ्यास करणे.

३) छ.शिवाजी महाराज व अफजलखान भेट व खानाचा वध अभ्यासने.

४) छ. शिवाजी महाराजांच्या युद्ध नीतीचा अभ्यास करणे.

५) प्रतापगडावरील ऐतिहासिक वास्तूंचा अभ्यास करणे.

## किल्ले प्रतापगड: स्थान व मार्ग :

प्रतापगड किल्ला महाबळेश्वरच्या नैऋत्येस १३ कि. मी. वर आहे. किल्ल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची १०८० मीटर आहे. प्रतापगड सह्याद्रीमधील आंबेनळी (फिट्झगेरॉल्ड) घाट आणि पार घाट यांच्यामध्ये आहे. छ. शिवाजी महाराजांनी किल्ला बांधण्यापूर्वी यास भोरप्या डोंगर म्हणून ओळखले जात होते. त्यास डोरप्या, गुडघ्याचा व टोपल्या डोंगर अशीही नावे आहेत.[1] फुलपाखरासारख्या आकाराच्या प्रतापगडची लांबी-रुंदी अनुक्रमे ३००-४०० मीटर अशी आहे.[2] गडावर जाण्यासाठी महाबळेश्वर-पोलादपूर मार्गावरील आंबेनळी घाटातील कुंभरोशी (वाडा) पासून मार्ग आहे. तसेच पारघाट मार्गावरील पार गावापासूनही दुसरा मार्ग आहे.

## प्रतापगडाच्या इतिहास :

इ. स. ५ ते ७ व्या शतकामध्ये जावळीवर राष्ट्रकुटांची सत्ता होती. यादवकाळात जावळी कोकणच्या मौर्यांचे वंशज मोरेंकडे होती. देवगिरीच्या यादवांचे साम्राज्य अस्त पावल्यावर शिर्केनी मोरेंकडून जावळी जिंकून घेतली. बहामनी राज्याची पाच शकले झाल्यावर विजापूरच्या आदिलशाहीचा पहिला युसूफ आदिलखान याने भीमा ते विजापूरपर्यंतच्या प्रदेशावर सत्ता प्रस्थापित केली आदिलखानाने मोरेंना जावळीचा ताबा देऊन त्यास चंद्रराव हा वंशपरंपरागत किताब बहाल केला यानंतर सात पिढ्यांपर्यंत मोरे जावळीचा कारभार पहात होते. मोरेंची जावळी म्हणजे वाघाची जाळी संबोधली जात होती.

यशवंतरावाच्या स्वराज्यविरोधी भूमिकेमुळे छ. शिवाजी महाराजांनी जावळीवर स्वारी केली. दि. २७ जानेवारी, १६५६ रोजी जावळी स्वराज्यात समाविष्ट झाली. या भागातील शूर व काटक लोक महाराजांच्या लष्करात दाखल झाले. जावळी ताब्यात आली तेव्हा प्रतापगडाच्या ठिकाणी एक गढी होती. दुर्गाचा राजा असणाऱ्या छ. शिवाजी महाराजांनी येथील प्रदेश रक्षणासाठी व येथील घाटमार्ग ताब्यात ठेवण्यासाठी ही जागा अत्यंत महत्त्वाची असल्याचे जाणले. त्यांनी मोरोपंत पिंगळे व अर्जोजी यादव यांचेकडे किल्ला बांधकामाचे काम सोपविले. सन १६५६ ते १६५८ मध्ये किल्ल्याचे बांधकाम पूर्ण झाले. महाराजांनी किल्ल्याचे नाव ठेवले प्रतापगड. सभासद बखरीत प्रतापगडाबाबत म्हटले आहे, आहे ''खांसा राजा चालोन जाऊन जावळी सर केली. मावळे लोकांस कौल देऊन संचणी केली. *प्रतापगड म्हणवून नवाच वसविला.*''

## छ. शिवाजी महाराज व अफजलखान भेट व खानाचा वध :

सन १६५९ च्या उन्हाळ्यात छ. शिवाजींचे पारिपत्य करण्यासाठी अफजलखानास रवाना करण्याचा विचार विजापूर दरबाराने केला. विजापूर दरबारचा तवारिखदार सय्यद नुरुल्ला आपल्या

ISSN No. 2394-5990

'तारीख-इ-अली आदिलशाही' मध्ये लिहितो, ''सुलतानाने अफजल खानास सांगितले की, शिवाजीस निपटून काढले पाहिजे. तो शरण येण्याचे ढोंग करील. पण त्याच्यावर विश्वास ठेवू नकोस. मृत्यूचा अग्नी त्याच्या जीवनाच्या शेतावर पडला पाहिजे.''

अफजलखानाने मोहिमेची जय्यत तयारी केली. बारा हजार निवडक फौज बरोबर घेतली आणि चढे घोड्यानिशी शिवाजी राजांना धरून आणण्याचा मनसुबा रचून खान सप्टेंबर १६५९ मध्ये विजापूरहून निघाला. महाराजांनीही खानाच्या बंदोबस्तासाठी प्रतापगडाची निवड केली. इकडे पुण्याच्या रोखाने निघालेला खान वाईस आला. वकिलांकरवी बातचीत सुरू झाली. छ. शिवाजी महाराजांनी कळविले, मध्यवस्था मोठ्या सैन्याशी सामना करण्याची ताकद माझ्यात नाही. झालेले अपराध पोटात घालून खान जीवदान देतील, तर मी आपल्या ताब्यातील सर्व मुलूख सोडून देण्यास तयार आहे. अशा नम्रतेच्या निरोपांनी खानास आपली मोहिम फत्ते होणार असा विश्वास वाटू लागला. खानास आपल्या कपटनीतीची व शक्तीची घमेंड होती. त्याने शिवाजी राजांच्या भेटीसाठी आपण जाण्याचे ठरवून रडतोंडीच्या घाटाने आपली फौज जावळीपर्यंत नेली.

छ. शिवाजी महाराजांनी खानाच्या भेटीची व आपल्या बचावाची तजवीज काळजीपूर्वक केली. मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी, गुरुवार, दिनांक १० नोव्हेंबर १६५९ हा भेटीचा दिवस मुक्रर करण्यात आला. त्यानुसार भेटीसाठी प्रतापगडाच्या पायथ्याशी भव्य शामियाना उभारला. अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी चिटणीस, कान्होजी जेधे, येसाजी कंक आदि विश्वासू सहकाऱ्यांना महाराज बोलले, *''आम्ही ही होड आरंभिली.* श्री सिद्धीस नेईलच, कदाचित वाकडेही घडल्यास तुम्ही घाबरे न होता शत्रूस बुडवावे, राज्य रक्षावे.'' यानंतर भवानी देवीचे दर्शन व जिजाबाईंचा आशीर्वाद घेऊन महाराज खानाच्या भेटीसाठी निघाले.

अफजलखान शामियाण्यात येऊन दाखल झाला. छ. शिवाजी महाराज जिवा महाला समवेत शामियाण्यात दाखल झाले. खानाने आपली तलवार वकील कृष्णाजी भास्कर याच्या हाती दिली. छ. शिवाजींनी अफजलखानाच्या नजरेला नजर भिडविली *व त्यांनी आपल्या हातातील पट्टा जिवा महाला याचेकडे* दिला. अफजलखानाने अलिंगनासाठी हात पुढे केले. राजांनी आलिंगन देताच खानाने राजांचे डोके आपल्या डाव्या काखेत दाबून धरले व राजांवर कट्यारीचा वार केला. खानाचा वार राजांनी चिलखत घातले असल्याने कारगर झाला नाही. राजांनी अत्यंत चपळाईने आपल्या डाव्या हातातील वाघनखे खानाच्या पोटात खुपसली व त्याचे पोट फाडले व कट्यारीने खानावर जोरदार वार केले.[९] खान दगा-दगा करून ओरडू लागला. इतक्यात सय्यद बंडा राजांवर दांडपट्टा घेऊन चालून आला. जिवा महालाने अत्यंत चपळाईने सय्यद बंडाचा दांडपट्टा उगारलेला हात कलम केला व नंतर त्यास ठार मारले. संभाजी कावजी, कांताजी इंगळे, कोंडाजी व येसाजी कंक, कृष्णाजी गायकवाड, सुरजी काटे, विसाजी मुरंबकर इत्यादींनी खानाच्या अंगरक्षकांना ठार केले. इकडे भोयांनी खानाचा मुडदा पालखीत घालताच संभाजी कावजीने भोयांना मारून खानाचे शिर कापले. छ. शिवाजी राजे आपल्या अंगरक्षकासमवेत खानाचे मुंडके घेऊन प्रतापगडावर पोहचले.

प्रतापगडाच्या नगारखान्यातील नगारे दणाणू लागले. गडावरील तोफांना बत्ती देण्यात आली. सह्याद्रीच्या दऱ्या-खोऱ्या दणाणून गेल्या. पूर्वनियोजनाप्रमाणे नेताजी पालकर, मोरोपंत पिंगळे, कमळोजी साळुंखे, तानाजी मालुसरे, कोंडाजी वडखल, रामजी पांगारे इत्यादींनी शत्रूसैन्यावर एकच हल्ला केला. रुस्तुमिजखान, अंबरखान, अफजलखानाचे दोन मुलगे, रणदुल्लाखान, राजाजी घाटगे इत्यादी सरदार कैद झाले. अफजलखानाचा मोठा मुलगा फाजलखान खंडोजी खोपडयाच्या मदतीने पळून गेला. खानाच्या फौजेची प्रचंड वाताहत झाली. या युद्धात त्याचे ३००० सैनिक कामी आले. तर तितकेच कैद झाले. महाराजांचेही बाबाजी भोसले, शामराव पद्मनाभी हे सरदार युद्धात कामी आले. तर राजांचे १७३४ सैनिक कामी येऊन ४२७ सैनिक जखमी झाले.

प्रतापगडाच्या युद्धात खानाचे निशाण, नगारा, ९५ हत्ती, चार हजार घोडे, १२०० उंट, ७० तोफा शिवाय सामान व जडजवाहीर असा १० लाखांचा ऐवज महाराजांना मिळाला.[१०] या महान युद्धामुळे जावळीची अरण्यभूमी या समयी जयवद्री या नावांस पात्र होऊन प्रतापगडाचे नाव जगाच्या इतिहासात ख्यातकीर्त झाले. सन १६५९ ते १८१८ या प्रदीर्घ कालखंडात सन १६८९ मधील काही महिन्यांचा कालावधी सोडला तर प्रतापगड शत्रूला कधीच मिळाला नाही.

**प्रतापगडावरिल ऐतिहासिक वास्तू :**

छ. शिवाजी महाराजांनी जावळी खोऱ्याचे महत्त्व ओळखून *प्रतापगडाची बांधणी केली.* मुख्य किल्ला व बालेकिल्ला असे किल्ल्याचे दोन भाग होत. मुख्य किल्ल्याचे क्षेत्रफळ ३,८८८ चौ. मी. तर बालेकिल्ल्याचे क्षेत्रफळ ३,६६० चौ. मी. आहे. किल्ल्यास संरक्षणाच्या दृष्टीने चोहोबाजूस भक्कम तटबंदी व बुरुज आहेत. आग्नेयेकडील बुरुजास भगवा बुरुज या टेहळणी बुरुज असे संबोधले जाते. वायव्येकडील बुरुजास रेडका बुरुज

तर ईशान्येकडील बुरुजास यशवंत बुरुज असे म्हटले जाते. गडाचा मुख्य दरवाजा पश्चिमाभिमुख असून त्याची बांधणी तोफांचा मारा होणार नाही अशी केली आहे. येथून जवळच दुसरा दरवाजा लागतो. हा दरवाजा म्हणजे गडाच्या माचीवरून (टेहळणी बुरुज) गडावर प्रवेश करण्याचा शिवकालीन मार्ग होय. आज घडीला हा मार्ग बंद असून दरवाज्याच्या संरक्षक बुरुजाला लागून असणारी तटबंदी पाडून तयार केलेला मार्ग आज अस्तित्वात आहे. गडावरती रहाट तळे, स्नानाचे तळे, गोडे तळे व नासके तळे हे तलाव आहेत. गडाचे कडे बेलाग आहेत. पश्चिम व उत्तरेकडील कडे २५० मीटर पेक्षाही जास्त खोलीचे व रौद्र आहेत. गडावरून सभोवारचा प्रदेश व वाटा नजरेत भरतात.

### बालेकिल्ला :

सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रतापगडावर सर्वात उंच भागावर बालेकिल्याचे बांधकाम केले आहे. बालेकिल्ल्याचे तट उंच व भक्कम आहेत. बालेकिल्ल्याचा दरवाजा तटबंदीत असणाऱ्या बुरुजांच्या आहारी आणून बांधलेला आहे. महाद्वाराची आणि बालेकिल्ल्याच्या दरवाज्याची रचना सारखीच आहे. बालेकिल्ल्याच्या दरवाज्यावरील छत आज अस्तित्वात नाही.

बालेकिल्ल्यात सदरेचे अवशेष दिसून येतात. सदरेवरून गडाचा व राज्याचा कारभार चालविला जात असे. केदारेश्वर मंदिरासमोर ६० फूट लांब व २० फूट रुंद आकाराचा दगडी चौथरा आहे. या चौथऱ्यावरच गडाची मुख्य सदर होती.

### तुळजा भवानी मंदिर :

तुळजा भवानी छ. शिवाजी महाराजांची कुलस्वामीनी होय. तुळजा भवानीच्या कृपेमुळे स्वराज्य स्थापनेत राजांना यश मिळाले होते. परंतु देवीचे स्वराज्यात वास्तव्य नव्हते. यासाठी द्रव्य उपलब्ध करून महाराजांनी मंबाजी बिन गोमाजी नाईक पानसरे या निष्ठावंत सरदारांस गंडकी शिळा आणून भवानीची मूर्ती सिद्ध करण्याची आज्ञा केली. मंबाजीने त्रिशुळ गंडकी, श्वेत गंडकी व सरस्वतीच्या संगमात शिळेचा शोध घेऊन नेपाळातील कुशल कारागिरांकडून चंद्र, सूर्य, सिंह व चक्र यांनी युक्त व युद्धायुधांनी सुसज्ज अशी अतिभंग प्रकारातील (एका अंगावर झोक देऊन प्रहरणाच्या पवित्र्यातील उभा मूर्ती प्रकार) अष्टभुजा भवानी महिषासुरास मारीत आहे अशी शिल्पकृती करवून घेतली. आश्विन शुद्ध प्रतिपदा शके १५७९ (इ. स. १६५७) रोजी समारंभपूर्वक देवीची गडावर स्थापना केली.[९] सुंदर मंदिर उभे राहिले. छ. शिवाजी महाराज राज्याभिषेक प्रसंगा अगोदर दि. १९ मे १६७४ रोजी भवानी देवीच्या दर्शनासाठी प्रतापगडावर आले व यावेळी त्यांनी तीन मण वजनाचे सुवर्णछत्र भवानीदेवीस अर्पण केले.[१]

### केदारेश्वर महादेव मंदिर :

मराठ्यांच्या सर्व दुर्गावर महादेवाची मंदिरे आहेत. 'हर हर महादेव' हा मावळ्यांचा युद्धघोष होय. केदारेश्वर महादेव मंदिर प्रतापगडाच्या बालेकिल्ल्यात राजसदरेच्या समोर आहे.

### छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा :

प्रतापगडाच्या बालेकिल्ल्यावर ६.०८ मीटर उंचीचा छ. शिवाजी महाराजांचा भव्य ब्रॉझचा अश्वारुढ पुतळा उभारला. प्रतापगडावर पुतळा उभारण्याची कल्पना मुंबई राज्याचे माजी राज्यपाल हरेकृष्ण मेहताबांची होय. मात्र ती प्रत्यक्षात आणण्याचे कार्य यशवंतराव चव्हाण व बाळासाहेब देसाई यांनी केले. छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे हस्ते दि. ३० नोव्हेंबर, १९५७ रोजी करण्यात आले.[१०] यावेळी नेहरूंनी *महाराजांच्या कार्याचा गौरवपूर्ण* उल्लेख केला. वाई, प्रतापगड मार्गावर संयुक्त महाराष्ट्र समितीच्या कार्यकर्त्यांनी नेहरूंना काळे झेंडे दाखवून निषेध नोंदवत मुंबई आमची आहे. हे नेहरूंना सांगण्याचा प्रयत्न केला. नेहरूंना मराठी जनतेच्या भावनेची व संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाची गांभीर्याने जाणीव झाली.

### अफजलखानाची कबर :

अफजलखानाचा वध केल्यानंतर छ. शिवाजी महाराजांनी त्याची कबर बांधली असावी. एक चुने गच्चीवजा ओटा असे त्याचे स्वरूप होते. पालखीच्या माळावर (जनीच्या टेंब्यावर) असणाऱ्या या कबरीचे नूतनीकरण सन १८९५ मध्ये हैद्राबादच्या निजामाने केले. छोटेखानी कबरीऐवजी एक प्रचंड कबर उभारण्यात आली. अफजल मेमोरियल ट्रस्टमार्फत कबरीची शाही बडदास्त ठेवली जाते.

### निष्कर्ष :

१) जावळीचा मुलुख कसा ताब्यात आला हे दिसून आले.
२) प्रतापगड परिसर ताब्यात ठेवण्यासाठी व येथील घाटमार्ग ताब्यात ठेवण्यासाठी छत्रपती शिवरायांनी प्रतापगडचे बांधकाम केल्याचे दिसते. यातून छ. शिवाजी महाराजांचे किल्ला स्थापत्य दिसून आले.
३) अफजलखानाच्या बंदोबस्तासाठी निबिड अरण्य असलेल्या प्रतापगड परिसराची महाराजांनी का निवड केली हे लक्षात आले.

ISSN No. 2394-5990

४) अफजलखानाचा वध करून छत्रपती शिवरायांनी आपली मुत्सद्देगिरी व शौर्य दाखवून दिले.

५) प्रतापगडच्या युद्धाने शत्रूंना महाराजांचा धाक वाटू लागला.

६) अफजलखानाच्या वधाने व प्रतापगडच्या युद्धाने महाराजांची ख्याती सर्वदूर पसरली.

७) बालेकिल्ला, भवानी मंदिर, केदारेश्वर महादेव मंदिर, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा, अफजलखानाची कबर या प्रतापगडावरील ऐतिहासिक वास्तू अभ्यासता आल्या.

**सारांश :**

जावळी विजयानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतापगडची उभारणी केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजखानाच्या बंदोबस्तासाठी निबिड अरण्यांनी वेढलेल्या प्रतापगडची निवड केली. दि. १० नोव्हेंबर १६५९ रोजी महाराजांनी अफजलखानाचा वध केला. आफजलखान वधाने महाराजांची ख्याती सर्वदूर पसरली. प्रतापगडाच्या युद्धाने छत्रपती शिवाजी महाराजांना हत्ती, घोडे, उंट, तोफा असा १० लाखांचा ऐवज मिळाला. प्रतापगडाच्या उभारणीतून महाराजांचे किल्ला स्थापत्य दिसून आले.

**संदर्भ सूची :**

१) पाठक अरुणचंद्र (संपा), सातारा जिल्हा गॅझेट- १९९९, पृ. ८०१

२) घाणेकर प्र. के., साद सह्याद्रीची भटकंती किल्ल्यांची, स्नेहल प्रकाशन, पुणे, पृ. १५४

३) हेरवाडकर र. वि. (संपा), सभासद बखर, व्हीनस प्रकाशन, पुणे, पृ.८

४) जोशी पु. म., शिवाजी महाराज आणि विजापूरची आदिलशाही, मराठ्यांचा इतिहास, खंड १, पृ.१५५

५) गर्गे स.मा.(संपा.) सरदेसाईकृत मराठी रियासत खंड १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ.१९१

६) हेरवाडकर र. वि. (संपा.), उपरोक्त, पृ. २२

७) जोशी मुकुंद, युद्ध प्रतापगडचे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पृ.१०३

८) गर्गे स.मा (संपा.), उपरोक्त, पृ.१६८

९) देशपांडे प्र.न., रायगड दर्शन, पृ. ९ व रायगड गॅझेट, १९९३,पृ.८४३, ८४४

१०) सावंत इंद्रजित, प्रतापगडची जीवनगाथा, सह्याद्री इतिहास संशोधन केंद्र, कोल्हापूर, पृ. १०१

■■■